# प्रेमाचा अभाव आणि वंध्यत्व



**डॉ. सुविनय दामले**
drsuvinay@gmail.com

हल्ली वंध्यत्वाचे रुग्ण वाढलेत. स्त्री पुरुष दोघांमध्येही पुरुषार्थ कमी पडतोय. पुरुषार्थ हा शब्द आयुर्वेदात स्त्री आणि पुरुष या दोघांसाठीही वापरलाय. तसे चार पुरुषार्थ वर्णन केलेत. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष  या चार पुरुषार्थामध्ये काम हा पुरुषार्थ संततीसाठी, सुसंततीसाठी अत्यंत आवश्यक आहे. सहजीवनाचे रंग उडून जायला लागलेत. लटके खटके वाढून फटके बसू लागलेत. लीव्ह इन मधे राहणारी जोडपी मूल नकोच म्हणतात. जेव्हा वाटेल तेव्हा दत्तक घेऊ असंही सांगतात, त्यांना वाटतंय, मुलं बाजारात विकत मिळतात. अजून जाऊदेत थोडे दिवस, नव्याची नवलाई आहे, असं म्हणत म्हणत पाळी जायची वेळ येते, तेव्हा बाळ व्हायला हवं, याची आठवण होते. एका बाजूने भारताची लोकसंख्येत भर पडते आहे, पण दुसरीकडे अपत्य नसलेल्या जोडप्यांची संख्या मात्र वाढतेच आहे.

## नैसर्गिकतेचे यांत्रिकीकरण

मूल होण्यासाठी औषधांची गरजच नसते, ही एक सर्व सामान्य नैसर्गिक प्रक्रिया आहे. गर्भ रहाणे, त्याची वाढ होणे, गर्भाशयातून कधी बाहेर यायचे हे सर्व गर्भच ठरवीत असतो. पण आज काल प्रेग्नन्सी आणि डिलीव्हरी दोघांसाठीही डॉक्टरांवर अवलंबून राहावे लागतेय. आणि डॉक्टर यंत्रावर... यंत्र जे सांगेल तसंच गर्भाने आत वाढायचं असतं म्हणे, एवढ्या दिवसात त्याने एवढं वाढलंच पाहिजे, नाहीतर त्याला जगण्याचा काही अधिकार नाही. डॉक्टरांच्या मनातील प्रेम पण पूर्णतः आटत चाललंय, मुलं होण्याच्या नैसर्गिक प्रक्रियेचं पूर्ण व्यावसायिकीकरण झालंय. यात कोणतीही पॅथीमध्ये तेच चाललंय. कोणीही धुतल्या तांदळासारखा स्वच्छ राहिला नाहीये. आज आयुर्वेदातील प्रसूतितंत्र देखील पूर्णतः आधुनिक झालंय. पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे बसून, कोमट पाण्यामध्ये प्रसूती हे जणू विसरायलाच झालंय. आईला टेबलवर आडवे झोपवून पुश्श पुश्श म्हटल्यावर बाळाने जणू काही रांगत रांगत सरकत सरकत पुढे जन्माला यायचं ? कसं शक्य आहे? हेड लो ठेवून जसं बॅडमिंटनचं शटल आपोआपच खाली येतं, तसं गर्भाशयात बाळ हेड लो ठेवूनच खाली येतं. त्याच पोझिशनमध्ये बाहेर येणे सोप्पं नाही काय?

असो. वंध्यत्व म्हणजे मूल होण्यामध्ये येणारे अडथळे. मूल होण्यासाठी नवरा आणि बायको हे दोन पार्टनर अत्यंत आवश्यक आहेत. त्यांच्यामधील उत्कट प्रणयभावना ही मूल होण्याला खूप मदत करीत असतात. पण ही प्रेमभावना उशिरा उशिरा कमी होत जाते. म्हणूनच लग्न झाल्यावर लगेचच्या वर्षात घरात पाळणा हलला पाहिजे असं म्हणतात. नाहीतर जसं वय वाढत जातं, तसं उत्कट प्रेम कमी होतं आणि शुक्रधातू कमी पडायला सुरवात होते. हो, शुक्रधातू म्हणजे फक्त वीर्य म्हणजे स्पर्म नव्हे हं, शुक्र हा शब्द आयुर्वेदानुसार पुरुष आणि स्त्री या दोघांमधील अत्युच्च पुरुषार्थाला उद्देशून वापरला जातो. दोघांमधील कामभावना उत्कट असणे आवश्यक आहे.

नवरा बायको मधील उत्कट प्रेमाचा नातेसंबंध कमी होत चाललाय यामुळेच वंध्यत्व येऊ शकते. हे उत्कट प्रेम कमी होण्याची कोणती अशी कारणे आहेत ज्यामुळे वंध्यत्व येऊ शकते?

## अतिपरिचयात अवज्ञा

अतिपरिचयात अवज्ञा, मराठीत अशी एक म्हण आहे. पती पत्नी मधे अतिपरिचय व्हायला लागला की उत्कटता कमी होते. नवरा बायकोतील पहिल्या वर्षांतील प्रेम जेवढे जास्ती असते, तेवढे दोन वर्षाने राहात नाही. आणखीन तीन चार वर्षाने आणखीन कमी होते. तसतसे शारीरिक मानसिक आकर्षणदेखील कमी होत जाते. म्हणजेच उत्कटता कमी होत जाते.

अर्थात यात अपवाद असतात हे पण मान्य करावेच लागेल. पहिल्या वर्षात दर महिन्यात नवीन जोडप्यातील शारीरिक संबंध चाळीस पन्नास वेळेस येतात. तेच प्रमाण दरवर्षी कमी होत जाते आणि चार पाच वर्षात हेच प्रमाण दरमहा दहा बारा वेळेपर्यंत कमी होते. आणखी पाच वर्षात तेच प्रमाण दरमहा तीन चार वेळेपर्यंत कमी होते. आणि जेवढे शारीरिक संबंध जास्ती येतील तेवढेच शुक्रप्रवर्तन जास्ती होते. शुक्र वाढण्यासाठीच्या कोणत्याही पॅथीच्या कोणत्याही औषधापेक्षा, एकमेकांमधील उत्कट प्रेम, सहवास, संभाषण,

आंतरिक ओढ, चिंतन,  हेच मोठे शुक्रवर्धनाचे काम करत असते.

पूर्वीच्या काळी बहुसंख्य नवरा बायकोचा व्यवसाय एकमेकांना पूरक असायचा, जसे, नवऱ्याच्या कुंभार कामात बायको मदत करू शकत होती. नवऱ्याच्या शिंपीकामात बायकोची सहज मदत मिळत होती. शेतकरी कुटुंबात शेतावर गरम गरम न्याहारीची टोपली बायकोच घेऊन जात होती. आठवलं का गाणं... माळ्याच्या मळ्यामंदी पाटाचं पानी व्हातं, गुलाब जाई जुई मोगरा फुलवीत.. किंवा ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू दे.. नवरा बायकोचा व्यवसाय एकमेकांना पूरक असल्याने सतत सहवास होता, ओढ टिकून होती. एकमेकांची मदत एकमेकांना होत होती. व्यवसायात ''बॉस'' कुणीच नव्हतं. दोघंही बॉस होती. व्यवसायातील छक्के पंजे एकमेकांना माहीत होते. कुटुंबाची एकत्रित आवक जावक एकमेकांना माहीत असल्याने गरजाही कमी होत्या, रुसवे फुगवे, हट्ट कमी होते. खरेदी एकत्रच व्हायची. एकमेकांना विचारूनच वस्तूंची आवडनिवड ठरायची. भांडणं वाद, मतमतांतरे कमी होती.

आता एकमेकांचे बॉस बदलले. आर्थिक प्राप्तीत फरक पडला. कामाच्या जागा बदलल्या. जाण्यायेण्याचे मार्ग बदलले, दोघंही शारीरिकदृष्ट्या जास्ती दमू लागली. एका बाजूने शॉपिंग, खरेदी स्व तंत्राने होऊ लागली, एकमेकांना खर्च समजेनासे झाले. क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड स्वतंत्र झाली. वैचारिक स्वातंत्र्य मिळाले. तथाकथित समता आली, मित्र मैत्रिणी स्व-तंत्राने बदलत गेली दरमहा भिशी, क्लब मीटिंग, सार्वजनिक मंडळातील सामाजिक सहभाग, राजकीय मतेदेखील बदलत गेली आणि प्रेम उणावत गेले. एकमेकांची गरज कमी होत गेली. केवळ मानसिकच नव्हे तर शारीरिकदेखील!

### लग्नाआधीचा थकवा

विवाह ठरल्यानंतर लगेचच विवाह व्हायचे. आता लग्न ठरून विवाह व्हायला एक एक वर्षाचा काळ जायला लागला. काही जण तर लिव्ह इन मध्येच धन्यता मानू लागली. पिढीमध्ये नवीन अपत्याची भर पडणे हे ओझे



वाटू लागले. मूल होणे म्हणजे खर्च वाढवणे वाटू लागले.

मला आठवतंय, दवाखान्यात चौथ्या वेळेस गर्भधारणा राहिलेल्या एका लमाणी कुटुंबात मी प्रश्न विचारला, तुम्हाला तीन मुलं आहेत, आता परत आणखी चौथं मुलं कशाला हवंय? सहज खडा टाकावा म्हणून पुढे म्हटलं, वाढती महागाई, आधीच खर्च किती वाढलेत.. त्यांचं शिक्षण, वगैरे.. त्या अशिक्षित अडाणी निरक्षर जोडप्याने माझं बोलणं तोडत म्हटलं, ''डाक्टरसाब असं कसं म्हनता तुमी, मुलं वाढल्यानं खर्च वाढंल की कमी हुईल? खातं तोंड एकच वाढतं, पण पैका कमावणारं हात दोन हुत्यात. जेवढी पोरं जास्ती तेवढा त्येंचाबी हाथभार संसाराला लागतुया, आनी पुढं बी एकमेकांना आधार व्हतोयच की....''

त्या जोडप्याचं नियोजन एवढं अचूक होतं, त्यापुढे आमच्या ''आयटी''तल्या तज्ज्ञांची मला कीव करावीशी वाटली. तर लग्नाअगोदरच एकमेकांचा सहवास वाढला. आणि साहजिकच एकमेकांतील उत्कटता विशेषतः शारीरिक आकर्षण देखील कमी होत गेलं. आज आय टी कंपनीत काम करणारी नवविवाहित जोडपी त्या कामात एवढी गर्क असतात, की त्यांना स्वतःसाठी ''स्पेस'' शोधायला पण त्यांच्या बॉसची परमिशन लागते.

## हनीमूनचा ग्लॅमर आणि सुप्रजाजनन

लग्न झाल्यानंतर लगेचच हनीमुनला ही पद्धत पण या तीस चाळीस वर्षातील त्यापूर्वी?? बरं ते फिरायला जाणं, याला प्लॅनिंग करून मूल राहू न देणं म्हणतात. ज्या कारणासाठी विवाह झालाय ते मुख्य कारण आहे, **सुप्रजाजनन** उत्तम संतती व योग्य वेळेत जन्माला घालणं, योग्य वयात त्यांचे संगोपन करणं, इ.इ. पण आता हनीमून हा पण सोपस्कार राहिलाय. एखाद्या आज्जीने जर आता असं म्हटलं तर, तिचं काय चुकलं सांगा बरं? '' एवढं जळलं ते एकत्र फिरायला जायचं, पण मूल व्हायला मात्र दवाखाना नाहीतर फर्टीलीटी क्लिनिकलाच जावं लागतं मग तो हनीमुनचा खर्च तरी कशाला करायचा म्हणते मी..?''

असंच एक जोडपं मुंबईच्या ओपीडीत चार पाच वर्षांनंतरही मूल होत नाही, म्हणून दवाखान्यात आलेली. सर्व चौकशी केल्यानंतर समजलं की त्यांचा शरीर संबंधच नीट येत नाहीये. आणि त्याचं कारण त्यांचे जॉब. आता काय करणार?

## लग्नाला विलंब

लग्नाचे वय असताना उत्कट प्रेमाच्या भावना जेवढ्या तीव्र असतात, त्या वय उलटून गेल्यानंतर कशा राहतील ? यालाच सेक्स स्टारवेशन म्हणतात.

## कामजीवनाचे अति ज्ञान

पूर्वी कामजीवन कधी शिकवलं जात नव्हतं, पण आता ते शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट झालंय, त्यामुळे अज्ञानातील सुख अनुभवताच येत नाही.

अधिकच्या ज्ञानामुळे विशिष्ट दिवसात शरीर संबंध ठेवले की गर्भ धारणा होते, हे कळल्याने इतर दिवशी समागम होतच नाही. म्हणजेच त्या क्रियेमधील निर्व्याज आनंद संपून जातो.

## अति तिथे माती

ज्ञानाच्या बाबतीत पण तेच सत्य आहे. वयात येताना कामजीवनाचे शिक्षण निसर्गच शिकवत असतो. जेव्हा शालेय अभ्यासक्रमात लैंगिकशिक्षण नव्हते, तेव्हा मूलं होतच नव्हती


काय ? उलट संख्या जास्ती होती. आता वंध्यत्व असणाऱ्या जोडप्यांची संख्या जास्ती वाढायला लागली आहे, ही धोक्याची घंटा आहे.

वेळेत सावध होणे गरजेचे आहे. नाहीतर कुठेतरी ॲमेझॉनवर जाहिरात येईल,''आमच्याकडे प्रेमाचा अभाव आहे, मूल विकत घेणे आहे.''

**(लेखक, कुडाळ, सिंधुदुर्ग येथील प्रथितयश आयुर्वेद तज्ज्ञ असून, भारत सरकार नियुक्त राष्ट्रीय आयुर्वेद गुरू आहेत. युट्युब वर सहा लाखांहून अधिक सबस्क्राईबर असणारे, गीनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद असणारे, आहार रहस्य जीवन रहस्य अशा अनेक लोकप्रिय पुस्तकांचे ते लेखक आहेत.)**

❏

## डॉक्टर होणे सोपे नसते




मान सन्मान खूप मिळतो
मिळतो सोबत पैसाही
पण एक सांगू तुम्हाला
डॉक्टर होणे सोपे नसते!

आरोग्य सेवेतही येथे
व्यवसायाचे गणित असते
असून खूप हुशार अभ्यासू
डॉक्टर होणे सोपे नसते!

रोग निदान आणि चिकित्सा
रुग्ण सेवेचे ब्रीद स्मरते
रात्रंदिवस एक करूनही
डॉक्टर होणे सोपे नसते!

कुटुंब वैयक्तिक सुखदुःखाची
आठवणही यांना नसते
ध्यास रुग्णसेवेचा घेऊनही
डॉक्टर होणे सोपे नसते!

रोज लागते नवीन कसोटी
रुग्ण वेदना तेव्हा शमते
कृतार्थ जीवदान देऊनही
डॉक्टर होणे सोपे नसते!

अपयश वा चूक जराशी
जनक्रोधाची झळ छळते
डॉक्टरही माणूसच
केवळ सुज्ञालाच हे कळते!

असतात काही लोभी
सुक्या सोबत ओले जळते
आदर्श वैद्यकीय सेवेची
उगाच बदनामी होते!

माय बाप बंधू सखा
डॉक्टर जणू देवा सारखे
त्याग समर्पण पराकाष्ठेतूनही
डॉक्टर होणे सोपे नसते!

**– डॉ. मीना सोसे, लोणार**



स्व. सौ. पार्वतीबाई बासरे स्मृती
आरोग्य
व्याख्यानमाला
तप-पूर्ती सोहळ्यास
हार्दिक
शुभेच्छा!
■ एक लक्ष रुग्णांची प्रथम व फेर तपासणी.
■ हृदय रोगावर शस्त्रक्रिया करणारे नांदेड परिसरातील पहिले रुग्णालय.
■ दरवर्षी 23 जानेवारीला हृदयरोग शिबिराचे आयोजन काब्दे कॉम्प्लेक्स परिसरात सुरु झालेले भव्य रुग्णालय श्री नारायणा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अंतर्गत अँजियोग्राफी, अँजियोप्लास्टी, अत्याधुनिक अतिदक्षता विभाग, हृदयरोग, आंतरग्रंथी (थायराईड, मधुमेह इ.) मेंदु विकार विशेषज्ञ इ. विभाग
नांदेडमधील
वैद्यकीय सेवेची
48 वर्षे पूर्ण.
NIMS
नारायणा
सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल
महावीर सोसायटी, नांदेड
डॉ.व्यंकटेश काब्दे
FRCP (Canada)
MBBS, MD (Punjab),
डॉ.अजित काब्दे
Cardiologist
MBBS, DNB, Med. (Mumbai)
DNB Cardiology (Delhi),
FISE, FACC (USA)
डॉ.आदिती काब्दे (पंडित)
MBBS, DNB, Med. DNB
(Endocrinology)
Army Hospital, Delhi
(Audit & Paediatric
Endocrinologist)




दीर्घायु स्मरणिका-२०२५
विशेषांकप्रित्यर्थ हार्दिक शुभेच्छा!
2800
CRORES PLUS
4900+
CRORES BUSINESS
उपलब्ध सुविधा
गोल्ड लोन
आरटीजीएस एनईएफटी
गोदाम पावती कर्ज
वाहन कर्ज
दैनिक ठेव योजना
मोबाईल बँकिंग
लॉकर
मासिक उत्पन्न योजना
• मुदत ठेव (F.D.) योजना •
गुंतवणूक कालावधी | व्याजदर
30 ते 45 दिवस | 7.00%
46 ते 180 दिवस | 8.00%
181 ते 365 दिवस | 9.00%
366 दिवसांहून अधिक | 10.00%
2 वर्षापेक्षा जास्त 1 लाखावर मिळवा ₹900/-
2 वर्षापेक्षा कमी 1 लाखावर मिळवा ₹850/-
455 दिवस 10.00%
90 महिन्यात दाम दुप्पट
प्राईड ऑफ महाराष्ट्र पुरस्कार
प्रतिबिंब पुरस्कार
दीपस्तंभ पुरस्कार
अर्थरत्न पुरस्कार
बँको पुरस्कार
सहकार गौरव पुरस्कार
राष्ट्रीय पुरस्कार-बेस्ट को-ऑप.सोसायटी
सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार
धनंजय तांबेकर
व्यवस्थापकीय संचालक, गोदावरी अर्बन
संचालक, मॅफको
सौ. राजश्री हेमंत पाटील
अध्यक्ष,
गोदावरी अर्बन
गोदावरी अर्बन
मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि. नांदेड
कार्यक्षेत्र : महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगाना, गुजरात, गोवा
Follow us on : www.godavariurban.com
मुख्यालय : 'सहकारसूर्य' एमएसईबी समोर, तरोडा नाका, पूर्णा रोड,नांदेड-४३१६०५.फोन:०२४६२-२६७२७७, ७७७५००५७७७
Email : officeadmin@godavariurban.com
प्रशासकीय कार्यालय : रिजेंट चेंबर्स, पहिला मजला, स्टेटस हॉटेलच्या वर, नरीमन पॉईंट, मुंबई -४०००२१
विश्वास तुमचा, जबाबदारी आमची!